

# विश्व अहिंसा दिवस

## ऑनलाईन राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा २०२४

गांधी रिसर्च फाउण्डेशनद्वारा ०२ ऑक्टोबर २०२४ विश्व अहिंसा दिनानिमित्त ऑनलाईन राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी लवकरात लवकर आपला सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी व भाषणाचा व्हिडिओ अपलोड करण्यासाठी https://www.gandhifoundation.net/GRF_comp_2024_ENG.htm वेबसाईट वर भेट द्या.

## ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा २०२४

| गट | इयत्ता | भाषा | विषय | पुरस्कार राशि** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्रथम** | ६वी ते ८वी | मराठी<br>हिंदी<br>English | १) मोहनचे आणि माझे बालपण<br>२) गांधीजींचे तीन माकड : आजच्या आव्हानांचे उपाय | **प्रथम**<br>**₹ ५०००/-** | **द्वितीय**<br>**₹ ३०००/-** | **तृतीय**<br>**₹ २०००/-** |
| **द्वितीय** | ९वी ते १२वी | मराठी<br>हिंदी<br>English | १) गांधी विचारांमध्ये आजच्या 'क्लायमेट चेंज'चे उत्तर दडलेले आहे काय?<br>२) चुका होणं स्वाभाविक पण पुनरावृत्ती नको | **प्रथम**<br>**₹ ७०००/-** | **द्वितीय**<br>**₹ ५०००/-** | **तृतीय**<br>**₹ ३०००/-** |
| **तृतीय** | प्रथम वर्ष ते पदव्युत्तर | मराठी<br>हिंदी<br>English | १) बापु आज सोशल मिडियावर असते तर...<br>२) समाजातील वाढत्या हिंसेला गांधीजींची अहिंसा हेच उत्तर | **प्रथम**<br>**₹ १००००/-** | **द्वितीय**<br>**₹ ७०००/-** | **तृतीय**<br>**₹ ५०००/-** |
| **चतुर्थ** | खुला गट | मराठी<br>हिंदी<br>English | १) खिरापतीची राजनिती आणि गांधी विचार<br>२) गांधीजींचे नेतृत्व: राजकीय नेत्यांसाठी प्रेरणा की समस्या | **प्रथम**<br>**₹ १००००/-** | **द्वितीय**<br>**₹ ७०००/-** | **तृतीय**<br>**₹ ५०००/-** |

** मराठी-हिंदी-इंग्रजी भाषांतून आलेल्या भाषणांमधून एकत्रितपणे विजेते निवडले जातील.

## नियम व अटी

**I. सर्वसाधारण नियमावली :**

a. एका स्पर्धकाने एकच व्हिडिओ पाठवावा.
b. दोन विषयांपैकी एकच विषय निवडावा.
c. भाषणाची क्लिप जास्तीत जास्त ०४ मिनिटांची असावी.
d. मोबाईल कॅमेरा तसेच इतर कॅमेराद्वारे व्हिडिओ तयार केलेला असावा.
e. रेकॉर्डिंगचे ओरिएंटेशन आडवेच (horizontal) ठेवावे.
f. मराठी-हिंदी-इंग्रजी यांपैकी कोणत्याही एका भाषेमध्ये भाष्य असावे.
g. आपल्या संवादांची सुरुवात पुढील प्रमाणे असावी. "मी ........................राहणार ..........., इयत्ता ......., ..... शाळा .......................... गांधी रिसर्च फाउण्डेशनद्वारा महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत ........ हा विषय आपणासमोर मांडत आहे....."
h. भाषण विषयाला धरुन असावे. असत्य, वादग्रस्त विधाने, अर्धवट माहितीच्या आधारे केलेले भाषण ग्राह्य धरले जाणार नाही.
i. सादरीकरण उत्स्फूर्त व न अडखळता असावे. वाचन करुन भाषण करु नये. ते ग्राह्य धरले जाणार नाही.
j. व्हिडीओ करतांना योग्य प्रकाश असावा व सभोवताली शांत वातावरणात व स्पष्ट आवाजात तयार करण्यात यावा.
k. व्हिडीओ आपल्याद्वारे नव्याने तयार केलेला असावा, यापुर्वी प्रकाशित वा शेअर केलेला नसावा.
l. व्हिडीओ रेकॉर्डींग पुर्ण झाल्यावरच आपण आपले ऑनलाईन रजिस्ट्रेशन https://www.gandifoundation.net/GRF_comp_2024_ENG.htm या लिंकवर भरावे.

**II. ऑनलाईन रजिस्ट्रेशन व व्हिडीओ पाठविण्याची प्रक्रिया:**

a. उपरोक्त लिंकवर स्पर्धकाने आपली संपुर्ण माहिती भरून, सोबत आपले ओळखपत्र (शाळेचे किंवा कॉलेजचे आय कार्ड अथवा आधारकार्ड) व भाषणाची व्हिडीओ क्लिप अपलोड करावी.
b. भाषणाची क्लिप पाठविण्याची अंतिम तारीख : **२१.०९.२०२४ (रात्री ११:५५ पर्यंत - सर्व गटांसाठी)**

**III. निवड प्रक्रिया :**

a. प्राप्त झालेल्या सर्व व्हिडीओ क्लिप्स मधून परिक्षकांनी निवडून दिलेल्या क्लिप्स गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या सोशल मिडियावर (फेसबुक, युट्युब व इन्स्टाग्राम) अपलोड करण्यात येतील.
b. सर्व स्पर्धांचा निकाल १०.१०.२०२४ रोजी गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या वेबसाईट www.gandhifoundation.net वर जाहीर करण्यात येईल.

**IV. सन्मान**

a. सहभागी सर्व स्पर्धकांना ऑनलाईन प्रमाणपत्र दिले जाईल.
b. विजेत्या स्पर्धकांची पुरस्काराची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाईल.

**V. इतर आवश्यक**

a. या स्पर्धेसाठी नियुक्त परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
b. स्पर्धेतील व्हिडीओ इतर ठिकाणी प्रकाशित करण्याचे सर्व अधिकार गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे राखीव असतील.
c. स्पर्धेतील आपला सहभाग म्हणजे सर्व अटी मान्य आहेत असे समजले जाईल.
d. उपरोक्त नियम व सूचनांमध्ये बदल करण्याचा अधिकार गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे राखीव असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

**गांधी रिसर्च फाऊंडेशन**
• सत्य • अहिंसा • शांती

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत; फोन: ०२५७ २२६४८०३; ९४०४९ ५५२२०, ९८२३३ ६२३३०
ई-मेल: info@gandhifoundation.net; वेबसाईट: www.gandhifoundation.net